CMYK


व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्काचा भार हलका करणार >> पान 2

गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष आणि जिल्हास्तरीय समित्या स्थापन >> पान 3

हिवरा खुर्द येथे अवैध गौण खनिज उत्खनन; पुणे कंपनीच्या व्यवस्थापकांवर गुन्हा >> पान 4


**सुविचार**

तडजोड हे आयुष्याचं दुसर नाव आहे



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 214 ■ शनिवार, दि. 14 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

ज्या ताटात जेवलात, त्यातच छिद्र?; रुचिता जामदारवर जान्हवी किल्लेकरची टीका

आतील पान

# बळजबरीने धर्मांतर केल्यास १० वर्षांचा तुरुंगवास

## महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ मध्ये कठोर तरतुदी

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात गेल्या काही काळापासून प्रलोभने, फसवणूक आणि बळजबरीने होणाऱ्या धर्मांतराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या 'बेकायदेशीर धर्मांतराच्या' विळख्यातून सर्वसामान्य जनतेचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६' आणले आहे. बेकायदेशीर धर्मांतर केल्यास १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची कठोर तरतूद त्यात करण्यात आली असून, अशा प्रकरणांमधील गुन्हे अजामीनपात्र ठरवण्यात आले आहेत.**





भारताच्या संविधानाने धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला असला, तरी तो सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्तेच्या अधीन आहे. अनेक प्रकरणांत भोळ्याभाबड्या नागरिकांना नोकरीचे आमिष, मोफत शिक्षण, लग्नाचे वचन किंवा 'दैवी चमत्कार' दाखवून धर्मांतरित केले जाते. हे रोखण्यासाठी आणि राज्याची सामाजिक वीण टिकवण्यासाठी हा कायदा आणला जात आहे.

विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी

१) आमिषाची स्पष्ट व्याख्या : भेटवस्तू, रोख रक्कम, नोकरी, धार्मिक संस्थांच्या शाळेत मोफत शिक्षण, विवाहाचे वचन किंवा अधिक चांगल्या जीवनशैलीचे प्रलोभन देणे म्हणजे 'आमिष' मानले जाईल.

२) दोषींना कठोर शिक्षा : कलम ३ चे उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाख रुपये दंडाची तरतूद आहे. जर पीडित व्यक्ती अल्पवयीन, महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीची असेल, तर ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड आकारला जाईल.

३) पुनरावृत्ती केल्यास १० वर्षे कोठडी : ज्यांनी यापूर्वी असा गुन्हा केला आहे आणि ते पुन्हा दोषी आढळले, तर त्यांना १० वर्षांपर्यंत कारावास आणि ७ लाख रुपये दंडाची शिक्षा होईल.

४) संस्थांची नोंदणी रद्द होणार : जर एखाद्या संस्थेने (उदा. एनजीओ, अनाथाश्रम, रुग्णालय) बेकायदेशीर धर्मांतर घडवून आणले, तर त्या संस्थेची नोंदणी रद्द केली जाईल आणि संबंधितांना ५ लाख रुपये दंड व ७ वर्षे कारावास भोगावा लागेल.

धर्मांतरासाठी आता ६० दिवस आधी नोटीस

नवीन नियमांनुसार, जर कोणाला स्वेच्छेने धर्मांतर करायचे असेल, तर त्यांना जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे (सक्षम प्राधिकारी) ६० दिवस आधी तशी नोटीस द्यावी लागेल. धर्मांतरानंतर २१ दिवसांच्या आत घोषणापत्र सादर करणे अनिवार्य आहे. जर प्रक्रिया पाळली नाही, तर ते धर्मांतर शून्यवत (अवैध) मानले जाईल.

लग्नासाठी केलेले धर्मांतर ठरणार बेकायदेशीर

केवळ धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह न्यायालयाकडून रद्द ठरवले जातील. मात्र, अशा विवाहातून जन्मलेल्या बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आले असून, त्यांना आई-वडिलांच्या मालमत्तेत अधिकार मिळेल आणि आईची अभिरक्षाही कायम राहील.

तक्रार कोण करू शकते?

केवळ पीडित व्यक्तीच नव्हे, तर तिचे आई-वडील, भाऊ-बहीण किंवा रक्ताच्या नात्यातील कोणीही व्यक्ती पोलिसांत प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करू शकते. विशेष म्हणजे, हे सर्व गुन्हे 'दखलपात्र आणि अजामीनपात्र' असतील.

## पेड पिरीयड लीव याचिकेवर सुप्रीम कोर्टाचं मोठं निरीक्षण, अशा महिलांना नोकरीवर....

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मासिक पाळीशी संबंधित शारीरिक त्रासाचा विचार करून महिला कर्मचाऱ्यांना 'पेड पिरियड लीव' (पगारी रजा) देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने ऐकण्यास नकार दिला आहे. आज (शुक्रवार, १३ मार्च २०२६ रोजी) झालेल्या सुनावणीत न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि जस्टिस जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. यावेळी सीजेआय सूर्यकांत म्हणाले, ''महिलांना इतके कमकुवत समजू नका. तुमची ही मागणी ऐकायला जरी योग्य वाटत असली, तरी ती अंतिमत: महिलांचे नुकसानच करणारी ठरेल. जर पगारी रजा अनिवार्य केली, तर कंपन्या महिलांना नोकरी देण्यास विचार करतील.'' अशा याचिकांमुळे महिलांच्या कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात, असेही न्यायालयाने या याचिकेबाबत बोलताना स्पष्ट केले आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील एम. आर. शमशाद यांनी युक्तिवाद केला की, केरळ सरकारने शाळांमध्ये अशी व्यवस्था लागू केली आहे आणि अनेक खासगी कंपन्या स्वत:हून अशा रजा देत आहेत. त्यावर न्यायालयाने उत्तर दिले की, ''जर एखादी कंपनी स्वेच्छेने रजा देत असेल तर ती चांगली गोष्ट आहे.

परंतु, जर आम्ही कायद्याने याची सक्ती केली, तर न्यायव्यवस्था किंवा सरकारी नोकऱ्यांमध्येही महिलांना प्राधान्य दिले जाणार नाही. यामुळे महिलांचे करिअर संपुष्टात येऊ शकते.''

सुनावणीदरम्यान जस्टिस जॉयमाल्या बागची यांनी नमूद केले की, ही संकल्पना चांगली असली तरी ज्यांना पगारी रजा द्यायची आहे, त्या नियोक्त्यांच्या मानसिकतेचाही विचार करणे आवश्यक आहे. न्यायालयाने म्हटले की, याचिकाकर्त्याने आधीच सरकारला या संदर्भात निवेदन दिले आहे. आता केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांनी सर्व भागधारकांशी चर्चा करून यावर धोरण ठरवावे. न्यायालयाने या याचिकेबाबत बोलताना म्हटलं की, मासिक पाळी ही काही 'वाईट घटना' नाही. अशा मागण्यांमुळे समाजात असा संदेश जातो की महिला कमकुवत आहेत, जे चुकीचे आहे. सरकार यावर चर्चा करून योग्य निर्णय घेऊ शकते, परंतु न्यायालय यात सक्तीचे आदेश देऊ शकत नाही'' असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

## सुरक्षेसाठी कॅमेरा बसवला अनब त्यानंच घात झाला, महिलेसोबत भयंकर घडलं, मुंबईत खळबळ


**मुंबई/प्रतिनिधी :** सध्याच्या काळात सुरक्षेसाठी अनेकजण सीसीटीव्ही कॅमेरे बसवतात. परंतु, सुरक्षेसाठी बसविलेले हे कॅमेरेच एखाद्याच्या खासगी आयुष्याला धोका ठरू शकतात. साकीनाका परिसरातील एका गृहिणीला याचा धक्कादायक अनुभव आला आहे. सोसायटीतील लिफ्टमधील तिचा आणि एका व्यक्तीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सोसायटी अध्यक्षाच्या मुलाविरुद्ध साकीनाका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

साकीनाका परिसरातील एका सोसायटीत ३६ वर्षीय महिला कुटुंबीयांसह राहते. तिच्या तक्रारीनुसार, जानेवारी २०२६ मध्ये सकाळी १० च्या सुमारास ती इमारतीच्या लिफ्टमधून जात होती. तेव्हा एक अनोळखी व्यक्ती लिफ्टमध्ये शिरला आणि तिच्या जवळ आला. ही घटना लिफ्टमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती.गृहिणी ९ मार्च रोजी सायंकाळी भाजी मार्केटमध्ये गेली होती. तेव्हा काही युवकांमध्ये एका व्हिडिओबाबत चर्चा ऐकू आली. तिने याबाबत चौकशी केली असता तिचाच लिफ्टमधला व्हिडिओ असल्याचे समजले. संबंधित सोसायटीतील सीसीटीव्ही फुटेजचा बॅकअप अध्यक्षांकडे आहे. परंतु, त्याचे तांत्रिक काम हा त्यांचा २५ वर्षांचा मुलगा पाहतो. त्यानेच परवानगीशिवाय व्हिडिओ व्हायरल केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## युद्धाची झळ शेगावपर्यंत; गॅससाठी लांबच लांब रांगा



**दैनिक आपला विदर्भ**



**शेगाव/प्रतिनिधी :** इराणइस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगभरात इंधन पुरवठ्यावर परिणाम होत आहे. त्याची झळ आता भारतातही जाणवू लागली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहरात घरगुती गॅस सिलेंडरसाठी नागरिकांना अक्षरशः भर उन्हात तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

शहरातील गॅस एजन्सीसमोर ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने अनेकांनी ऑफिसला दांडी मारली तर काहींनी घरातील काम बाजूला ठेवून रांगा लावल्या आहेत.

दुसरीकडे कमर्शियल गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे हॉटेल व्यवसायावरही परिणाम झाला आहे. चहा, नाश्ता, पोहे आणि इतर खाद्यपदार्थांच्या दरात वाढ करण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहरात आज सलग तिसऱ्या दिवशीही गॅस सिलेंडरसाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली.

शहरातील भारत गॅस एजन्सीसमोर सकाळपासूनच ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. गॅस मिळणार नाही या भीतीने नागरिकांनी मोठी गर्दी केली.

कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा कमी झाल्यामुळे अनेक छोटे हॉटेल चालक अडचणीत सापडले आहेत. काहींनी चहा-नाश्त्याचे दर वाढवले तर काहींनी नाईलाजास्तव आपली दुकाने बंद ठेवली. दरम्यान महसूल प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून सर्वांना गॅस मिळेल, अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

## महापालिका कारभारावर किशोरी पेडणेकरांची टीका; 'सत्तापालट झाल्यावर सत्ता अंगात भिनते का?' असा सवाल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेच्या कारभारावर माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी जोरदार टीका केली आहे. सत्तापालट झाल्यानंतर काही जण सत्तेच्या जोरावर वागत असल्याचा आरोप करत महापालिकेचा राज्य सरकारकडे असलेला पैसा तातडीने परत द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. ''लाडका बहीण'' योजनेचा पहिला हप्ता महापालिकेकडून देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. मिठी नदी स्वच्छता प्रकल्पाबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. ब्लॅकलिस्टेड कंत्राटदारांनाही काम दिले जात असल्याचा आरोप करत केंद्र आणि राज्य स्तरावर काम करणाऱ्या काही कंत्राटदारांना पुन्हा संधी दिली जात असल्याने संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले. महापौर आणि मुख्यमंत्री यांच्यात योग्य समन्वय नसल्याची टीकाही त्यांनी केली. बैठकींमुळे अधिकाऱ्यांवर ताण वाढत असल्याचाही आरोप त्यांनी केला. काही अधिकाऱ्यांनी लवकर निवृत्ती घेण्याची इच्छा व्यक्त केल्याचे सांगत रात्री उशिरापर्यंत बैठका घेतल्या जात असल्याने कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय शालेय पोषण आहार योजनेत समन्वयाचा अभाव असल्याचे सांगत मध्यान्ह भोजन वेळेत मिळणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच उदय सामंत यांच्या ठेवींमध्ये झालेल्या वाढीबाबतही सत्यता तपासून पाहणार असल्याचे पेडणेकर यांनी सांगितले.





## जिल्ह्यात इंधन टंचाई नाही; अफवा पसरवणाऱ्यांवर होणार कडक कारवाई-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आखातात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसची टंचाई निर्माण झाल्याच्या अफवा काही असामाजिक तत्त्वांकडून पसरवल्या जात आहेत. मात्र, जिल्ह्यात इंधनाचा कोणताही तुटवडा नसून नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे स्पष्टीकरण जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

काही ठिकाणी घरगुती गॅसची बेकायदेशीर साठवणूक केली जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. अशा बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष पथके स्थापन केली आहेत. जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभागामार्फत आता अशा साठेबाजांवर आणि अफवा पसरवणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

इंधन कंपन्यांच्या ( , व ) माध्यमातून जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा पुरवठा नियमितपणे सुरू आहे. त्यामुळे टंचाईची कोणतीही स्थिती निर्माण झालेली नाही. नागरिकांनी घाबरून न जाता गरजेनुसारच इंधन खरेदी करावे आणि कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर साठेबाजी करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



### साठेबाजी करणाऱ्यांविरुद्ध पथके तैनात



इंधन पुरवठ्याबाबत तक्रार असल्यास किंवा कुठे साठेबाजी व काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी नैसर्गिक आपत्ती कक्ष, बुलढाणा किंवा दूरध्वनी क्रमांक: ०७२६२-२४२६८३ वर तात्काळ संपर्क साधावा.

CMYK

## बिहारचे राजकीय चित्र येत्या काळात बदलणार...

राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करीत बिहारचे मुख्यमंत्री आणि जदयुचे सर्वेसर्वा नितीशकुमार यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. कोणाच्या ध्यानीमनी नसताना बिहारचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि पुन्हा एकदा राष्ट्रीय राजकारणात जाण्याच्या नितीशकुमार यांच्या अनपेक्षित निर्णयामुळे सर्वांना धक्का बसणे स्वाभाविक होते. या निर्णयाचे बिहारच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार असून बिहारचे राजकीय चित्र येत्या काळात बदलणार आहे. बिहारचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय नितीशकुमार यांनी घाईगर्दीत नाही तर अतिशय विचारपूर्वक घेतला आहे. या निर्णयाचा आपल्या घरावर आणि पक्षावर कोणता परिणाम होईल, याचा पूर्ण विचार करून नितीशकुमार यांनी अतिशय शांतपणे हा निर्णय घेतला आहे. एकदा मिळालेले मुख्यमंत्रिपद सोडायची कोणाची तयारी नसते. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी तर तुरुंगात सहा महिने जावे लागल्यानंतरही मुख्यमंत्रिपद सोडले नव्हते. मुख्यमंत्रिपदाचा बाडबिस्तर घेऊन तुरुंगात गेलेले केजरीवाल हे बहुधा देशातील पहिले मुख्यमंत्री असावे. नितीशकुमार जवळपास २० वर्षांपासून बिहारचे मुख्यमंत्रिपद सांभाळत आहेत. मुख्यमंत्रिपदाची सर्वाधिक म्हणजे १० वेळा शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. २००५ पासून बिहारचे राजकारण नितीशकुमार यांच्याभोवती फिरते आहे. राज्यात कोणत्याही आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच असतात. गेल्या २० वर्षांपासून नितीशकुमारांना वगळून बिहारच्या राजकारणाचा विचार करता येत नव्हता. राज्यात भाजपा आणि जदयु आघाडीचे सरकार असले तरी मुख्यमंत्री नितीशकुमार असतात तसेच राजद, काँग्रेस आणि जदयु आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडेच असते. अनेक वेळा नितीशकुमार यांनी भाजपाची साथ सोडत राजदचा कंदील हातात पकडला तर अनेक वेळा कंदिलाची वात विझवत कमळ हातात घेतले. पण नितीशकुमार यांच्या व्यक्तिगत प्रतिमेवर त्यांच्या या कोलांटउडीच्या राजकारणाचा फारसा परिणाम झाला नाही, त्यांची प्रतिमा डागाळली नाही, आयाराम गयाराम म्हणून त्यांची टिंगलटवाळी झाली नाही. अनेक वेळा तर समोरच्या पक्षापेक्षा नितीशकुमार यांच्या पक्षाचे कमी आमदार असतानाही मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांना मिळाले. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद ठेवणे ही बिहारमधील राजकीय पक्षांची अपरिहार्यता होती. सामान्यपणे कोणताही नेता विधानसभेची निवडणूक जिंकत मुख्यमंत्री होत असतो. पण विधानसभेत निवडून येत नितीशकुमार कधीच बिहारचे मुख्यमंत्री झाले नाहीत. एक अपवाद वगळता नितीशकुमार यांनी कधीच विधानसभेची निवडणूक लढवली नाही. विधान परिषदेचे सदस्य म्हणूनच त्यांनी जवळपास २० वर्षे मुख्यमंत्रिपद सांभाळले, हाही एकप्रकारचा विक्रम म्हटला पाहिजे. आपण विधानसभेची निवडणूक का लढत नाही, याचे कारण त्यांनी कधीच सांगितले नाही. बिहारच्या राजकारणात नितीशकुमार यांची लोकप्रियता चांगली होती, तरीही त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवण्याची हिंमत केली नाही. नितीशकुमार यांना बाजूला ठेवून वा वगळून बिहारच्या राजकारणाचा विचारही कोणाला करता येत नव्हता. बिहारच्या राजकारणाचा केंद्रबिंदू आतापर्यंत तरी नितीशकुमारच होते. प्रदीर्घ काळ बिहारच्या राजकारणात असतानाही नितीशकुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही तसेच घराणेशाहीच्या राजकारणाचा डाग त्यांनी आपल्या अंगाला लागू दिला नाही. ही त्यांची जमेची बाजू म्हणावी लागेल. त्यांचे प्रतिस्पर्धी नेते लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबांतील अर्धा डझन सदस्य राजकारणात असताना नितीशकुमार यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाला आतापर्यंत राजकारणात येऊ दिले नाही. बिहारच्या राजकारणात येण्यापूर्वी नितीशकुमार राष्ट्रीय राजकारणात होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वेमंत्रिपद भूषविले होते. त्यामुळे त्यांच्यासाठी राष्ट्रीय राजकारणही काही नव्हाळ्याची गोष्ट नाही. नितीशकुमार यांना पंतप्रधानपदाची स्वप्ने पडलीच नाहीत असे नाही. २०१४ च्या आधी विरोधी पक्षांची मोट बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न त्यांनी करून पाहिला. विरोधी आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आपण होऊ शकत नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी हा नाद सोडून दिला आणि भाजपा तसेच नरेंद्र मोदींशी जुळवून घेतले. त्याचा त्यांना नंतरच्या राजकारणात फायदाही झाला. राजकारणात योग्यवेळी योग्य निर्णय घेण्याची कला बिहारमधील नेत्यांना साधली आहे, असे म्हणावे लागेल. रामविलास पासवान यांच्यानंतर नितीशकुमार यात वाकबगार झाले होते, असे म्हणायला हरकत नाही. केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे नेते रामदास आठवलेही यात बसतात. विधिमंडळाच्या विधानसभा तसेच विधानपरिषद या दोन्ही सभागृहाचे सदस्यपद आपण भूषविले, अनेक कार्यकाळ लोकसभेचे सदस्यही होतो; मात्र आतापर्यंत कधीच राज्यसभेचे सदस्य नव्हतो. ती आपली अपूर्ण इच्छा पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्रिपद सोडत राज्यसभेत आपण जात असल्याचे नितीशकुमार सांगत असले, तरी त्यावर विश्वास बसत नाही. बिहारच्या राजकारणातून बाहेर पडण्याची घोषणा नितीशकुमार यांनी केल्यानंतर त्यांचा मुलगा निशांतकुमार याने औपचारिकपणे जदयुत प्रवेश केला. याचा अर्थ निशांतकुमार अधिकृतपणे नितीशकुमार यांचे राजकीय उत्तराधिकारी झाले आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जदयुची धुरा निशांतकुमारकडे सोपवत नितीशकुमार यांनी राज्यसभेचा वानप्रस्थाश्रम स्वीकारला, असे म्हणायला हरकत नाही. बिहारमध्ये विशेषतः जदयुत नितीशकुमार यांचे युग संपत निशांतकुमार यांचे पर्व सुरू होत आहे. नितीशकुमार राज्यसभेत जाण्याच्या निर्णयाचा सर्वांत मोठा फायदा भाजपाला होणार आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी भाजपाचा मुख्यमंत्री कधी झाला नाही. भाजपाला बिहारमध्ये उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागत होते. नितीशकुमार यांनी बिहार सोडल्यामुळे राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. एप्रिल महिन्यात नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहे. भाजपाने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार अद्याप जाहीर केला नसला, तरी जो कोणी बिहारचा मुख्यमंत्री होईल, त्याच्या मंत्रिमंडळात निशांतकुमार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून समावेश होऊ शकतो. आतापर्यंत जदयु नेत्याच्या म्हणजे नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात भाजपाचा उपमुख्यमंत्री राहात होता; आता भाजपा नेत्याच्या मंत्रिमंडळात जदयुचा नेता म्हणजे नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार उपमुख्यमंत्री होणार आहे. आपल्या मुलाला म्हणजे निशांतकुमारला राजकारणात आणण्यासाठी आणि प्रस्थापित करण्यासाठी नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत बिहार सोडण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला, असे म्हणायला हरकत नाही. नितीशकुमार यांच्या या दूरदर्शी राजकीय निर्णयाचा राज्यातील भाजपा, जदयु आणि राजदवर दूरगामी परिणाम होणार आहे. राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार आहेत, यात शंका नाही.

# व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्काचा भार हलका करणार

## शिष्यवृत्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुलभता: उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे.मुलींना १०० % शिक्षण शुल्क माफ आणि मुलांना ५०% शिक्षण शुल्क माफीचा लाभ देण्यात येत आहे. या निर्णयाविरोधी जे महाविद्यालय शुल्क आकारतील त्या महाविद्यालयांवर कारवाई करणार असल्याचे उत्तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानसभेत दिले. प्रलंबित शुल्क प्रतिपूर्ती आणि शिष्यवृत्ती वितरणातील अडचणींबाबत विधानसभा सदस्य रईस शेख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते.



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की,विद्यार्थ्यांसाठी अनेक वेळखाऊ बाबी होत्या त्यांची सुलभता केली. शिष्यवृत्ती अर्जातील माहितीची संख्या १३८ वरून ६६ पर्यंत कमी करण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे १७ वरून ८ वर आणली आहेत.आता सीईटी डेटा थेट वापरला जाणार असल्याने विद्यार्थ्यांना वारंवार जात प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत.कॉलेजेसची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन पहिल्या हप्त्याचे वितरण लवकर केले जाईल. शिष्यवृत्तीच्या वितरणाला पगारापेक्षाही अधिक प्राधान्य देण्याचे निर्देश मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. जून महिन्यापासून याची अंमलबजावणी होईल.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की,विद्यार्थ्यांसाठी अर्न अँड लर्न सारखी नवीन योजना यातून सुमारे ५ लाख विद्यार्थ्यांना दरमहा २हजार रुपये अतिरिक्त मानधन देण्याची योजना सरकार आखत आहे. या योजनेसंदर्भात अजून अधिकृत कोणतीही घोषणा नाही. याअंतर्गत विद्यार्थी विद्यापीठ किंवा कॉलेजच्या आवारात वृक्षारोपण, लायब्ररी व्यवस्थापन किंवा सामाजिक कामात मदत करतील. यासाठी सरकार, कॉलेज आणि सामाजिक संस्था मिळून निधी उभारतील. निर्वाह भत्ता ही योजना शहरांच्या वर्गवारीनुसार विद्यार्थ्यांना १० महिन्यांसाठी वसतिगृह भत्ता दिला जातो. मुंबई-पुण्यासारख्या शहरांसाठी दरमहा ६,००० रुपये (एकूण ६०,००० रुपये), महसूल विभागाच्या ठिकाणी ५,१०० रुपये आणि तालुका स्तरावर ४,८०० रुपये दिले जात आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, थकीत देयके वेळेवर अदा करण्यासाठी काही वित्तीय संस्थांशी (उदा. फेडरल बँक) चर्चा सुरू आहे. सरकार व्याज देईल आणि या संस्था थेट विद्यार्थ्यांचे किंवा कॉलेजचे शुल्क अदा करतील, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. शासकीय योजनांचा लाभ मिळत असूनही जे कॉलेज विद्यार्थ्यांकडून अवास्तव इतर फी आकारतील किंवा प्रवेश प्रक्रियेत अडवणूक करतील, अशा कॉलेजेसवर कठोर कारवाई केली जाईल. फॉर्म भरताना होणाऱ्या चुका टाळण्यासाठी राज्यात ४० केंद्रे सुरू केली जात आहेत. ही केंद्रे विद्यार्थ्यांना फॉर्म भरण्यासाठी आणि तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी मदत करतील. या प्रश्नाच्या अनुषंगाने विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार, कैलास पाटील यांनी सहभाग घेतला.

# पाकिस्तानी खेळाडूच्या खरेदीनंतर सनरायझर्स अडचणीत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** काव्या मारन यांच्या मालकीच्या सनरायजर्स लीड्स या टीमनं इंग्लंड येथे होणाऱ्या द हंड्रेड २०२६ च्या ऑक्शनमध्ये पाकिस्तान क्रिकेट संघाचा फिरकीपटू अबरार अहमद याला संघात घेतल्याने एकच खळबळ उडाली आहे. द हंड्रेडमध्ये आयपीएलशी संबंधित संघांच्या फ्रँचायजीकडून पाकिस्तानी खेळाडूंवर बोली लावली जाणार नसल्याची चर्चा होती. परंतु, प्रत्यक्षात तसं घडलेलं नाही. त्यामुळे काव्या मारन आणि सनरायजर्स लीड्सवर सोशल मीडियावर प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. तसेच आयपीएलमधील काव्या मारनच्या सनरायझर्स हैदराबाद संघाला आयपीएलमधून काढून टाका, अशी मागणी देखील करण्यात येत आहे. याचदरम्यान, एक महत्वाची माहिती समोर आली आहे.

१२ मार्च रोजी पार पडलेल्या 'द हंड्रेड'च्या लिलावादरम्यान, 'सनरायझर्स लीड्स'ने 'ट्रेंट रॉकेट्स' संघावर मात करत, अबरार अहमदला तब्बल १,९०,००० पौंडांच्या (सुमारे २.३४ कोटी रुपये) मोठ्या रकमेला आपल्या संघात सामील करून घेतले. मात्र, या निर्णयामुळे सोशल मीडियावर एकच चर्चा आणि वाद सुरू झाला; कारण अबरार अहमदने यापूर्वी अनेकदा सोशल मीडियावर भारताविषयी आक्षेपार्ह विधाने केल्याचे आरोप समोर आले होते.याचा परिणाम म्हणून, काही चाहत्यांनी सोशल मीडियावर जाऊन आयपीएलमधील संघ असलेल्या 'सनरायझर्स हैदराबाद'वर बहिष्कार टाकण्याची मागणी केली. या संपूर्ण वादानंतर, 'सनरायझर्स लीड्स'च्या अधिकृत '' खात्याबाबत एक महत्त्वाची बातमी समोर आली.आज १३ मार्च रोजी असे निदर्शनास आले की, या संघाचे '' खाते अचानक निलंबित (लेजह) करण्यात आले आहे. खाते उघडण्याचा प्रयत्न केल्यानंतर, ''हे खाते निलंबित करण्यात आले आहे. 'असा संदेश दिसत आहे. '' च्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खात्यांना निलंबित केले जाते.'' मात्र, नेमक्या कोणत्या विशिष्ट नियमाचे उल्लंघन झाल्यामुळे हे खाते निलंबित करण्यात आले आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, 'सन ग्रुप'ने गेल्या वर्षीच 'द हंड्रेड' स्पर्धेतील 'लीड्स' संघाचे संपूर्ण मालकी हक्क संपादन केले होते. हे हक्क मिळण्यापूर्वी, हा संघ 'नॉर्दर्न सुपरचार्जर्स' या नावाने ओळखला जात असे. 'सन ग्रुप'ने 'इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाकडून' (एणँ) ४९ टक्के आणि 'यॉर्कशायर काउंटी क्रिकेट क्लबकडून' उर्वरित ५१ टक्के हिस्सा खरेदी करून, या संघावर (फ्रँचायझीवर) पूर्ण नियंत्रण मिळवले होते.संघाचे मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी यांनी स्पष्ट केले की, अबरारचा संघात समावेश करण्याचा निर्णय हा अनेक ऑस्ट्रेलियन खेळाडूंशी चर्चा केल्यानंतरच घेण्यात आला होता.

पाकिस्तानी खेळाडूंना संघात घ्यायचे की नाही, यावर चर्चा करण्यासाठी लिलावापूर्वी फ्रँचायझीमध्ये कोणतीही विशिष्ट बैठक झाली नव्हती.

# ज्या ताटात जेवलात, त्यातच छिद्र ? ; रुचिता जामदारवर जान्हवी किल्लेकरची टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** कोल्हापूरची रुचिता जामदार नुकतीच 'बिग बॉस मराठी ६' मधून बाहेर पडली. घराबाहेर आल्यानंतर तिने अप्रत्यक्षपणे या शोवर आणि सूत्रसंचालक रितेश देशमुख यांच्यावर टीका केली. माझ्यासोबत भेदभाव झाला आणि मला माझी बाजू मोकळेपणाने मांडण्याची संधी मिळाली नाही, अशी नाराजी तिने व्यक्त केली.

रुचिताच्या या वक्तव्यांवर आता 'बिग बॉस मराठी ५' ची माजी स्पर्धक आणि अभिनेत्री जान्हवी किल्लेकर हिने जोरदार प्रतिक्रिया दिली आहे. इन्स्टाग्रामवर व्हिडिओ पोस्ट करत जान्हवीने बिग बॉस आणि रितेश देशमुख यांच्याविरोधात बोलणाऱ्या स्पर्धकांवर निशाणा साधला. ''ज्या ताटात जेवलात, त्यातच छिद्र का करताय?'' अशा शब्दांत तिने रुचिताला सुनावले.

काय म्हणाली जान्हवी ?

जान्हवीने व्हिडिओमध्ये सांगितले की, महाराष्ट्रात अनेक कंटेंट क्रिएटर्स, अभिनेते आणि इन्फ्लुएन्सर्स बिग बॉसच्या घरात जाण्याची संधी मिळावी म्हणून प्रयत्न करत असतात. ''बिग बॉस हा खूप मोठा शो आहे आणि त्या घरात जाण्याचं स्वप्न अनेक जण पाहतात. अशा मोठ्या मंचावर संधी मिळाल्यानंतर त्या शोबद्दल वाईट बोलणं योग्य नाही,'' असे ती म्हणाली.

पुढे थेट रुचिताचे नाव घेत जान्हवी म्हणाली, ''बिग बॉस पक्षपाती आहेत किंवा रितेश देशमुख पक्षपाती आहेत, असं बोलणं चुकीचं आहे. त्या शोने तुम्हाला संधी दिली, ओळख दिली. त्यामुळे त्या मंचाचा आदर ठेवायला हवा.'' तिने स्वत:चा अनुभव सांगताना म्हटले की, बिग बॉसच्या घरात असताना चुका होतात, गेम बदलतो, रागही येतो. ''मीसुद्धा अनेक चुका केल्या. वीकेंडच्या वाराला मला बोलूही दिलं नाही, कधी ओरडाही मिळाला. तरी मी कधीही शोला किंवा रितेश सरांना दोष दिला नाही,'' असे ती म्हणाली.

शेवटी जान्हवीने स्पष्ट इशारा देत म्हटले की, ''माझ्यासाठी बिग बॉस हा देवासारखा शो आहे. या शोमुळे मला महाराष्ट्रात ओळख मिळाली. त्यामुळे कोणालाही या शोविरोधात किंवा रितेश देशमुखांविरोधात बोलणं मी सहन करणार नाही.''

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्या; पांडुरंग पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

## १ रुपयात पिकविमा, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त व बिनशर्त कर्जमाफीसह विविध मागण्या

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घ्यावेत, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष तथा शेतकरी नेते पांडुरंग पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसील कार्यालयामार्फत निवेदन सादर केले. शेतकऱ्यांची विदारक परिस्थिती लक्षात घेऊन अधिवेशनादरम्यान शेतकरी हिताचे निर्णय घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनात निलगाय व हरीण यांसारख्या वन्य प्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. या प्राण्यांना पकडून जंगलात सोडावे किंवा शेतकऱ्यांसाठी १०० टक्के अनुदानावर कुंपण योजना राबवावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच विनाअट सरसकट कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, मागील कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकरी कुटुंबांबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. एक रुपयात पिकविमा योजना पुन्हा सुरू करून पिकविम्यातील पेरणी न होणे, स्थानिक नैसर्गिक आपत्ती,




मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती आणि काढणीनंतरचे नुकसान हे चार ट्रिगर पुन्हा लागू करावेत, तसेच २०२३ व २०२४ मधील रखडलेले पिकविमा तात्काळ वितरित करावेत, अशीही मागणी करण्यात आली.

दरम्यान या मागण्यांवर शासनाने कारवाई न केल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाभर शेतकऱ्यांसह व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे गोपाल गरड, भागवतमामा बाजाड, प्रवीण काळदाते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते. निवेदनाची प्रत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनाही पाठवण्यात आली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### घरगुती गॅसचा मुबलक साठा; अफवांवर विश्वास ठेवू नका जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नसल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.सध्या काही ठिकाणी गॅस बुकिंग मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे वितरणात थोडा विलंब होऊ शकतो. मात्र ही अडचण केवळ कमर्शियल गॅसपुरती मर्यादित असून घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांवर प्रशासनाचे लक्ष असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिला आहे.

### नवरा नवरी घेऊन जाणाऱ्या स्कॉर्पिओवर ओपन जीपमधून चक्क नोटांची उधळण; मांडवापासून ते भर रस्त्यावर नोटांचा खच पडला

नवी दिल्ली : नववधू आणि वराला घेऊन जाताना चालत्या स्कॉर्पिओवर नातेवाईकांनी नोटांचा वर्षाव केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. भटिंडामध्ये वधू आणि वर ज्या गाडीत बसले होते त्या गाडीचा नोंदणी क्रमांक हरियाणाचा होता. ज्या चालत्या उघड्या जीपमधून नोटा फेकण्यात आल्या त्या जीपचा नोंदणी क्रमांक पंजाबचा होता. वधू आणि वरांच्या गाडीवर वर्षाव झालेल्या नोटांचा वर्षाव रस्त्यावर पडत राहिला, तर लग्नाच्या मिरवणुकीची वाहने पुढे जात राहिली. वधू आणि वरांच्या स्कॉर्पिओचा क्रमांक गुरुग्राम ट्रान्सपोर्ट अथॉरिटीचा आहे. उघड्या जीपवर जुना क्रमांक आहे, जो ऑनलाइन नोंदणी डेटा उपलब्ध नसला तरी, पंजाबचा नोंदणी क्रमांक असल्याचे मानले जाते.

५१ सेकंदांच्या व्हायरल व्हिडिओमध्ये वधू आणि वर पांढऱ्या स्कॉर्पिओमध्ये बसलेले दिसतात आणि त्यानंतर एक उघडी जीप येते, ज्यामध्ये ५-६ तरुण नाचत त्यांच्या खिशातून १० रुपयांच्या नोटांचे गठ्ठे काढतात. नंतर, नाचत असताना, ते त्या वधू-वरांच्या गाडीवर फेकू लागतात, जी त्यांच्या मागेच जात होती. दोन्ही वाहने वेगाने जात होती.

दरम्यान, त्यांच्या मागे असलेल्या एका वाहनातील दुसऱ्या व्यक्तीने त्यांचे चित्रीकरण केले. तो व्हिडिओमध्ये म्हणाला, ''बघा, नोटांचा पाऊस पडत आहे. ही लग्नाची मिरवणूक तिथून जात आहे. तरुण पैसे फेकत आहेत.'' दरम्यान, एक स्कॉर्पिओ हॉर्न वाजवतो. त्यानंतर, तरुण उघड्या जीपमध्ये उतरतात. व्हिडिओ बनवणाऱ्याने तो सोशल मीडियावर पोस्ट केला.

चालत्या वाहनातून वधू-वरांवर नोटा फेकण्याच्या या व्हिडिओवर सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काही लोक याला जीवघेणा म्हणत आहेत आणि ते अपघाताला आमंत्रण देत असल्याचे म्हणत आहेत.

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष आणि जिल्हास्तरीय समित्या स्थापन

- गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध
- अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने - राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही
- समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई - अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे.घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशीग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

**जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत. पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

**अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने**

रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.

गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील. समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येईल. गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील. गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही**

महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे. व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात.

घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे.इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# धीरुभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूल, बॉम्बे स्कॉटिश शाळेची होणार तपासणी; मराठी न शिकवल्यास मान्यता रद्द; राज्य सरकारचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात ज्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नाही, त्या संस्थांची मान्यता रद्द केली जाणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत यासंदर्भात माहिती दिली. मुंबईतील अनेक इंटरनॅशनल शाळांमध्ये मराठी शिकवले जात नसल्याचा मुद्दा ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार हारूण खान यांनी उपस्थित केला होता. याला उत्तर देताना शिक्षणमंत्र्यांनी ही माहिती दिली.

राज्यातील खासगी केजी, पीजी शाळांसाठी आता स्वतंत्र प्राधिकरण नेमले जाणार असल्याचे शिक्षणमंत्री म्हणाले. खासगी पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले असून राज्यात १२७३३ केंद्रांची नोंदणी आहे.यासाठी अधिनियम केला जाणार असून त्यासाठी सक्षम प्राधिकरण निर्माण केले जाणार आहे. तीन वर्षांनी पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणी करावी लागणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

माझी साडेचार वर्षांची मुलगी आहे.तिला इंग्रजी शब्द वाचता येतात. ती खाजगी शाळेत जाते.पण शासकीय अंगणवाडी मध्ये हा दर्जा का नाही. आपल्याला नियंत्रण ठेवावे लागेल. मुलांवर प्रेशर तयार होत आहे.आपण आठवीपर्यंत परीक्षा घेत नाही

रजिस्ट्रेशनचा नियम कधीपर्यंत आणणार आहोत.तुम्ही विचाराधीन आहेत एवढेच सांगत आहेत असे म्हणत भाजपचे आमदार विक्रम पाचपुते यांनीच शिक्षण विभागाचे वाभाडे काढले. स्वत:च्या मुलीला खाजगी इंग्रजी शाळेत घातल्याचे उदाहरण देत बालवाड्यांमधील शिक्षण सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. यावर दादा भुसेंनी उत्तर दिले. हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे अधिनियम झाला की तात्काळ अंमलबजावणी सुरु करू असे ते म्हणाले. शुल्काबाबत समावेश केला जाणार असून २० बालकांमागे एक शिक्षक असेल. अंगणवाडी व बालवाडी अपग्रेड करण्याचे काम सुरू असल्याचे ते म्हणाले.


**योगेश सागर काय म्हणाले?**

हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याआधी हा कायदा करणार का? पर्याय कोणता उपलब्ध केला आहे? शासनाकडे रजिस्ट्रेशन करण्यासाठी बंधनकारक केले आहे का? आवाहन आहे का बंधनकारक आहे? असे प्रश्न आमदार योगेश सागर यांनी विचारले.फी नियमन झाले पाहिजे. सुरक्षा महत्त्वाची आहे. प्री प्रायमरी साठी जागा निश्चित करा, असेही ते म्हणाले. यावर उत्तर देताना या सर्व सूचनांचा अंतर्भाव अधिनियमात केला जाईल त्या वर्गाची साईज, स्वच्छता गृह, वाहतूक, याबाबत सर्व नियमांचा समावेश केला जाईल. येत्या शैक्षणिक वर्षापूर्वी हा अधिनियम लागू केला जाईल, असे ते म्हणाले.

**सर्व शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची**

मराठी भाषा सक्तीची आहे तसा कायदा केला आहे. मग पालन का होत नाही? इंग्रजी माध्यमात मराठी अजून सक्तीची नाही. महाराष्ट्रातील उर्दू , गुजराती शाळेत मराठी सक्तीची आहे का? असा प्रश्न अमित देशमुख यांनी उपस्थित केला. यावर दादा भुसे यांनी उत्तर दिले.सर्व शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची आहे. येत्या शैक्षणिक वर्षांत पुन्हा तपासणी करून सक्तीची केली जाईल. उर्दू सोबत सर्व शाळ□त मराठी सक्तीची असल्याचे शिक्षणमंत्री यावेळी म्हणाले.

## शब्दकोडे क्र. 80



आडवे शब्द

१. गडवा ३. दरवर्षीनुसार ७. ज्ञानेश्वरांची प्रार्थना १०. नाचक्की १२. पोपट १४. वर्तुळ १६. बट्टा, कलंक १७. कौशल्य १९. शोक २१. कडधान्याचा अंकुर २१अ. हिंदीत शब्द, भाषा २२. चुलती २३. रामाचा एक भाऊ २५. हत्ती २६. अचानक बाहेर पडणारा पाण्याचा प्रवाह, पाण्याचा उगम २७. जोराचा वारा २८. इतर २९. पिता ३१. कबूल ३३. मेंदू (हिंदी) ३४. गुंड ३५. अब्रू ३६. अनुमती ३८. पीकदाणी ४०. वितरण ४२. सूर्यापासून प्राप्त ४३. भस्म ४४. कफल्लक ४५. विष्णूचे एक नाव ४६. दासी ४७. लोकनाट्य ४९. प्रशंसा ५२. खोटारडा ५४. श्रीराम ५८. हिंदीत दोस्त ६०. शय्या ६१. शाबासकी, कौतुकाची - ६३. ओझे ६५. वालीचा मुलगा ६७. हे एक असेल तर दोन तलवारी कशा बसणार? ६८. दिवस वाईट आले की बुद्धीही फिरते याअर्थी म्हण- '----- विपरीत बुद्धी' ७१. ठिकाणा ७३. किनारा ७४. डौलदार ७७. भूमी ७९. न आवरता येणारा ८१. पक्ष्यांचा राजा ८२. उजळवर्णी ८३. आकाश ८५. यौवन ८६. क्रिडा ८८. समुद्र ८९. आश्चर्यचकित ९०. छंद ९१. अडचण

उभे शब्द

१. लाल २. पीडा ३. समाविष्ट, मिळालेला ४. शिल्लक ५. हिंदीत द्वारपाल, रखवालदार ६. कबूल ८. संचय ९. उदाहरण, दृष्टांत ११. अप्रीती १३. लहर, तरंग १५. पती, धनी १७. खिसेकापू १८. अधीन १९. संकट २०. पाऊस २१. '--जो, जो रे' २२अ. तुळशीचा रंग, गेरू २४. कमतरता २५. बोभाटा २७. अश्व २८. ज्याला कोणी शत्रू नाही असा ३०. अस्थिर ३१. रात्र ३२. पिता ३५. दुर्दशा, हेळसांड ३६. मृदंग ३७. परत परत ३९. च्या साठी ४१. स्नानाचे पाश्चात्त्य भांडे ४८. अजागळ ५०. दैवाने, नशिबाने प्राप्त ५१.'-- --' मोठेपण तया यातना कठीण' ५२. मनाई ५३. वडील ५५. घोट ५६. आवाज ५७. न बोलण्याचे व्रत ५९. जोर ६२. अकारण ६४. आई ६६. दहावी तिथी ६७. मांजराचा आवाज ६९. वर्ष, संवत्सर ७०. लहान मूल ७२. कापडी तंबू ७५. धावून येणाऱ्या सरीमुळे वाहून जाणारे मातींचे पात्र ७६. जसा ७७. किंचित ७८. गाव ८०. पावसाचा देव ८१. मोजदाद ८४. नाकातील खानदानी दागिना ८७. नम्र

### शब्दकोडे क्र. 79 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे ेक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

उभे उत्तर

१.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.ेक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ७५.नान ७६.यम ७८.विडा

वृत्तविशेष...

## टीबी हॉस्पिटलच्या स्वयंपाकघरात चोरी; भरलेला गॅस सिलेंडर लंपास

खिडकी-दरवाज्याचा कडी-कोंडा तोडून चोरट्यांचा डाव; तांब्याची ऑक्सिजन पाईपलाईनसह सुमारे २ लाखांचा मुद्देमाल चोरी





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देशभरात गॅस तुटवड्याची परिस्थिती असताना बुलढाणा शहरातून चोरीची धक्कादायक घटना समोर आली आहे. बुलढाण्यातील टीबी हॉस्पिटलच्या स्वयंपाकघराची खिडकी आणि दरवाज्याची कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. स्वयंपाकघरात ठेवलेल्या १७ गॅस सिलेंडरपैकी एक भरलेला सिलेंडर तसेच इतर काही साहित्य चोरून नेण्यात आले आहे. याचबरोबर हॉस्पिटलमधील तांब्याची ऑक्सिजन पाईपलाईन देखील काढून नेल्याची माहिती समोर आली आहे. या चोरीमध्ये सुमारे दीड ते दोन लाख रुपयांच्या मुद्देमालाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## समृद्धी महामार्गाजवळ अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :**डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम अंजनी बु. (ता. मेहकर) येथील शेतशिवारात समृद्धी महामार्गाजवळ एका अंदाजे ४० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळल्याची घटना शुक्रवारी (दि.१३) घडली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १३ मार्च रोजी दुपारी सुमारे १२.१५ वाजताच्या सुमारास अंजनी बु. येथील पोलीस पाटील यांना समृद्धी महामार्गाच्या चॅनल क्रमांक २७५ जवळ, रोडलगतच्या नालीमध्ये एक अनोळखी पुरुष मृत अवस्थेत दिसून आला. याबाबत त्यांनी तत्काळ डोणगाव पोलिसांना माहिती दिली. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० वर्षे असून बांधा मजबूत, केस काळे व दाढी वाढलेली आहे. त्याने अंगात काळ्या रंगाचा पांढऱ्या पट्ट्या असलेला टी-शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट परिधान केलेली होती, असे प्राथमिक वर्णन आहे. या घटनेची माहिती मिळताच डोणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पोलीस पाटील टोनपे यांच्या तक्रारीवरून अकस्मात मृत्यूची नोंद (मर्ग) करण्यात आली असून पुढील तपास पोलीस ठाणेदार यांच्या आदेशानुसार पोहेकॉ संजय घिके यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून शवविच्छेदन अहवालानंतर अधिक माहिती स्पष्ट होण्याची शक्यता आहे. तसेच संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलीस करत आहेत.

## दिव्यांग लाभार्थ्यांनी १५ मार्चपर्यंत यूडीआयडी कार्ड सादर करा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**तहसील कार्यालय बुलढाणा अंतर्गत विविध योजनांचा लाभ घेत असलेल्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले यू.डी.आय.डी. () कार्ड संजय गांधी विभागात सादर करणे तसेच ते पोर्टलशी संलग्न करणे अनिवार्य असल्याची माहिती तहसीलदार बुलढाणा यांनी दिली आहे.

त्यानुसार सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी संजय गांधी विभाग, तहसील कार्यालय बुलढाणा येथे १५ मार्चपर्यंत खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती जमा कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

आवश्यक कागदपत्रे :

दिव्यांग प्रमाणपत्राची छायांकित प्रत

यू.डी.आय.डी. कार्डची छायांकित प्रत

आधार कार्डची छायांकित प्रत

निर्धारित मुदतीपर्यंत कागदपत्रे जमा न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचे योजना लाभ वितरण खंडित होऊ शकते, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यांची राहील, असेही तहसीलदार बुलढाणा यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रे जमा करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हिवरा खुर्द येथे अवैध गौण खनिज उत्खनन; पुणे कंपनीच्या व्यवस्थापकांवर गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** परवानगी न घेता लाखो ब्रास गौण खनिजाचे उत्खनन करून शासनाच्या महसुलाला मोठा फटका दिल्याचा गंभीर प्रकार मेहकर तालुक्यात उघडकीस आला आहे. हिवरा खुर्द येथील तलाव प्रकल्प परिसरात बेकायदेशीर उत्खनन करून क्रशर मशीन चालविल्याप्रकरणी पुणे येथील कंपनीच्या व्यवस्थापकांविरुद्ध जानेफळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी तहसीलदार निलेश भिवाजी मडके यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी म्हणून वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि., पुणे या कंपनीचे व्यवस्थापक अनिल सुरेशचंद्र मुंदडा व





हर्षद सुरेश मुंदडा यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मेहकर तालुक्यातील मौजे हिवरा खुर्द (सारंगवाडी) येथील तलाव प्रकल्पाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन करण्यात आले. मात्र हे उत्खनन करण्यापूर्वी महसूल विभाग किंवा सक्षम प्राधिकरणाकडून कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली नव्हती. तसेच गट क्रमांक ५४९ मध्ये परवानगीशिवाय गिट्टी क्रशर मशीन उभारून सप्टेंबर २०१३ ते एप्रिल २०१५ या कालावधीत तब्बल ३ लाख ७६ हजार ०८४ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे तपासात समोर आले आहे.

या बेकायदेशीर उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. या प्रकरणात यापूर्वीच महसूल विभागाने संबंधित कंपनीवर २९ कोटी १८ लाख ७७ हजार १२४ रुपयांचा दंड ठोठावला होता. त्यामध्ये २२ कोटी ५६ लाख ५० हजार ४०० रुपये दंडात्मक रक्कम आकारण्यात आली होती. मात्र कंपनी व्यवस्थापनाने ही रक्कम अद्याप भरलेली नसल्याने प्रशासनाने अधिक कठोर भूमिका घेत फौजदारी कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३७९, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८(७) व ४८(८), पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ९ व १५ तसेच खाण व खनिज अधिनियम १९५७ मधील कलम ४ व २१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## विनोबा ॲपमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिक्षकांचा सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**जिल्हा परिषद बुलढाणा व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत राबविण्यात येणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा (बा) ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना दर महिन्याला प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत बुलढाणा तालुका स्तरावर 'पोस्ट ऑफ द मंथ' म्हणून निवड झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये श्री. परवेज शेख (जि.प. उर्दू प्राथमिक शाळा, रायपूर), सौ. माधवी देशपांडे (जि.प. हायस्कूल, देऊळघाट), सौ. अनुराधा नागरे (जि.प. प्राथमिक शाळा, सिरपूर), सौ. विद्या चवरे (जि.प. उच्च प्राथमिक शाळा, देवपूर) आणि सौ. मीनाक्षी सरदेशमुख (जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, पाडळी) या शिक्षकांचा समावेश आहे. याचबरोबर जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती सराव परीक्षा व स्कॉलरशिप सराव परीक्षेत तालुक्यात उत्कृष्ट निकाल देणाऱ्या शाळांचाही गौरव करण्यात आला. यात जि.प. उच्च प्राथमिक शाळा मोंढाळा (इयत्ता पाचवी स्कॉलरशिप परीक्षा), जि.प. मराठी प्राथमिक शाळा रुईखेड मायंबा (इयत्ता आठवी स्कॉलरशिप परीक्षा) तसेच जि.प. मराठी प्राथमिक शाळा दाहिद बु. (एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षा) या शाळांचा समावेश आहे. सदर पुरस्कार बुलढाणा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी चेतन वाडीले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती बुलढाणा येथील अधिकारी व कर्मचारी तसेच आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमाचे वरिष्ठ जिल्हा समन्वयक शेख नजीर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी सन्मानित शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्यातून तालुक्यातील इतर शिक्षकांना प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## गॅस टंचाईची शक्यता; शालेय पोषण आहार चुलीवर शिजवण्याचे शिक्षणाधिकाऱ्यांचे निर्देश

जिल्ह्यातील १९८५ शाळांना सूचना; विद्यार्थ्यांचा पोषण आहार बंद पडू नये यासाठी पर्यायी व्यवस्था



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीचा परिणाम इंधन पुरवठ्यावर होण्याची शक्यता लक्षात घेता शालेय पोषण आहार योजनेबाबत बुलढाणा जिल्हा शिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शाळांमध्ये गॅस उपलब्ध नसल्यास विद्यार्थ्यांचा शालेय पोषण आहार बंद न करता सुरक्षिततेची सर्व खबरदारी घेत चुलीवर स्वयंपाक करून विद्यार्थ्यांना पोषण आहार वितरित करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळांना दिले आहेत.

जिल्ह्यात प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेअंतर्गत एकूण १,९८५ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. काही ठिकाणी गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांचा आहार खंडित होऊ नये, यासाठी हा पर्यायी उपाय सुचविण्यात आला आहे.

शाळांनी स्वयंपाक करताना सुरक्षिततेचे सर्व नियम पाळावेत, स्वयंपाकासाठी योग्य जागेची निवड करावी तसेच स्वच्छता व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असेही निर्देश शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत.


संग्रहीत

दरम्यान, या संदर्भात प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे गॅस उपलब्ध नसल्यासही शाळांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करून चुलीवर स्वयंपाक करून विद्यार्थ्यांना आहार देण्याची व्यवस्था करावी.

**-विकास पाटील,**
शिक्षणाधिकारी प्राथमिक, बुलढाणा

## मेरी पॉलिसी, मेरे हाथअंतर्गत तालुक्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन




दैनिक आपला विदर्भ

अशोक मुंढे

**महारचिकना:**तालुका कृषी अधिकारी कार्यालय लोणार यांच्या च्या वतीने प्रधानमंत्री फसल विमा योजने अंतर्गत मेरी पॉलिसी मेरे हाथ या उपक्रमाच्या माध्यमातून २५ फेब्रुवारी २०२६ पासुन तालुक्यातील गावागावात शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच विमा पॉलिसींचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी शिदोरे साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी कदम साहेब, तसेच भारतीय कृषी पीकविमा कंपनीचे तालुका समन्वयक अक्षय पेवकर आणि अमोल चव्हाण उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी शेतकऱ्यांना योजनेबाबत सविस्तर माहिती देत योग्य लाभ मिळविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# बुलढाणा जिल्ह्यात अवैध दारू-जुगार अड्ड्यांवर पोलिसांची धडक; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध दारू व जुगार अड्ड्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ३ लाख १ हजार ८४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ९ आरोपींविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने १२ मार्च २०२६ रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी



ही कारवाई केली.

माहितीनुसार, मेहकर पोलीस ठाणे हद्दीतील देऊळगाव माळी येथे वरळी मटका जुगार खेळवणाऱ्या इसमावर कारवाई करून २,२८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर मलकापूर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत ताताळा येथेही मटका जुगार प्रकरणात आरोपीकडून ९१० रुपये रोख व जुगार साहित्य हस्तगत करण्यात आले.

याचप्रमाणे तामगाव पोलीस ठाणे हद्दीत वरळी मटका जुगार खेळवणाऱ्या इसमावर कारवाई करत रोख रक्कम, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १ लाख ३४ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान बोरखेडी व अंमडापूर परिसरात अवैध दारू विक्री करणाऱ्या इसमांवरही छापे टाकण्यात आले. या कारवाईत विदेशी दारूच्या बाटल्या, रोकड व इतर साहित्य असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. पोलिसांनी सांगितले की, जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरुद्ध अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असून नागरिकांनीही अशा प्रकारची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.